**नि. फौ. खं. क्र. ८५/२०१९** **सरकार वि. हसन**

नि. ५७

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – मो. अल्ताफ व. फयाजउल हक

वय – ६६ वर्ष धंदा – मजुरी

पत्ता – नया बजार, कामठी, जि नागपुर

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. शेंडे यांचे कडून सुरु**

१. मी सर्व आरोपींना ओळखतो. ते माझ्या शेजारी राहतात. फिर्यादी ही माझी मोठी मुलगी आहे. घटना दिनांक ३०.१२.२०१८ रोजी रात्री १०.०० वाजता नया बजार, मंजुर किराणा दुकानाच्या बाजुला माझ्या घरी घडली होती. घटनेच्या वेळी आम्ही सर्व घरी होतो. आमच्या घरी मी, माझी पत्नी, माझे मुले व माझ्या मुली होत्या. माझ्या दोन मुली वरच्या मजल्यावर होत्या. त्यावेळी आम्ही घरी बसलो असताना तेथे जफार आला. आम्ही जावून दरवाजा उघडला त्यावेळी ते आमच्या घरात घुसले. त्यांनी माझा मुलगा सद्दाम हुसेन याला खेचले व त्याला विचारले तुझी बहीण कुठे आहे. आमच्या विरुध्द तक्रार करते. त्यावेळी त्यांनी मला देखील घानेरडी शिवीगाळ केली व धक्काबुक्की केली. त्यावेळी लोकांनी सोडवासोडव केली. त्यानंतर आम्ही आमच्या घरात परत गेलो व दारवाजा बंद केला. त्यानंतर घराबाहेर भरपूर गोंधळ ऐकू आला. लोकांनी आमच्या खिडक्या काठीने तोडून टाकल्या. त्यानंतर लोखंडी वारपींग पाईपने दोघांनी घराचा दरवाजा तोडला. अजाज हुसेन आणि सहबाज हुसेन यांनी दरवाजा तोडला. त्यानंतर सर्व जण आमच्या घरात घुसले. त्यामध्ये ब–याच बायका देखील होत्या. त्यांना मी ओळखत नाही. त्यानंतर त्या सर्वांनी मला, माझ्या पत्नीला, मुलांना व मुलींना मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर माझ्या मुलीने वरून पोलीसांना फोन केला त्यावेळी पोलीस तेथे आले. पोलीस आल्यानंतर पोलीसांनी कोणालाही अटक केली नाही. त्यानंतर पोलीस आम्हाला गाडीतून दवाखान्यात घेवून गेले. त्यानंतर पोलीसांनी आमचे बयाण घेतले व त्यानंतर आम्ही घरी आलो. माझ्या मुलीने रिपोर्ट दिली होती. पोलीस माझ्याकडे चौकशीसाठी आले नाही व माझा बयान घेतला नाही. आज न्यायालयात आरोपी जफर हजर आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. भिमटे यांच्याकडून.**

हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयात फिर्यादीसोबत आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की जबाब कसा द्यायचा हे माझी मुलगी सांगत होती. हे म्हणणे खरे नाही की तशी कोणतीही घटना घडली नव्हती म्हणून पोलीसांनी आरोपीला अटक केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पूर्ण

आयुष्य माझ्या घरात गेले आहे.  हे म्हणणे खरे आहे की माझ्या व आरोपीच्या घरामध्ये तिन ते चार फुटाचे अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे व आरोपीचे घर स्लॅपचे आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या मुलीला कुत्रे व मांजर पाळण्याची आवड आहे. हे म्हणणे खरे आहे की आज रोजी माझ्या घरी १३ मांजरे आहेत. माझी मुलगी दहा वर्षापासून कुत्रे व मांजरे साभांळत आहे.  हे म्हणणे खरे आहे की कुत्रे मांजर पाळण्याकरीत नगरपरिषदेची परवानगी घ्यावी लागते. साक्षिदार पुन्हा सांगतो की कोणत्याही परवानगीची आवश्यकता नाही. हे मला मान्य नाही की कुत्रे व मांजरांमुळे रेजीब सारखे आजार पसरतात. हे म्हणणे खरे आहे की कुत्रे व मांजर चावल्यास गंभीर आजार होवू शकतात. हे म्हणणे खरे आहे की मांजरांच्या लस, औषध याचा तक्ता ठेवावा लागतो. हे म्हणणे खरे नाही की प्राण्यांच्या विष्ठे साठी वेगळी सोय करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी मांजरांना व कुत्र्यांना खायला घातल्यानंतर शेजारचे इतर जनावर देखील ते खान्यासाठी येत होते. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळी भरगच्च वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की वस्ती मध्ये लहान मुले राहतात. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी मांजरांना व कुत्र्यांना खायला घातल असल्यामुळे आजुबाजुच्या लोकांना त्रास होत होता. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे लोकांनी माझ्या मुली विरुध्द तक्रार केली होती. हे म्हणणे खरे आहे की आरोपी व आमच्यामध्ये थोडे वाद होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी तक्रार दिल्यामुळे आमचे आरोपींसोबत पटत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी तक्रार दिल्यामुळे फिर्यादीने आरोपीं विरुध्द खोटी केस दाखल केली.  हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी खिडक्या व दरवाजा तोडल्याचे, मला घानेरडी शिवीगाळ केल्याचे, आम्हाला सर्वांना मारहाण केलयाचे, लोखंडी वारपिंग पाईपने दरवाजा तोडल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की सरतपासात सांगितल्या प्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वाक्षरी/-

ठिकाण –कामठी

**(सागर एस. जाधव)**

दिनांक –३१/०३/२०२३

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. २, कामठी.